वर्ष-०८ अंक-१७ मुंबई, मंगळवार १५ ते २१ मार्च - २०२२ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 वृद्ध झोपलेल्या झोपडीला लागली आग, नंतर घडलं हे विपरीत

3 → पुण्यात पोलीसांच्या नाकावर टिच्चून गुंडागर्दी, वाहनांची पुन्हा तोडफोड,

रशिया-युक्रेन युद्धामुळे महागाई वाढायची काळजी नको; केंद्र-राज्य सरकार योग्य ती काळजी घेईल: एकनाथ शिंदे ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## घरात सव्वा लाखांच्या ऐवजावर डल्ला



औरंगाबादः विकेंडच्या (Weekend) निमित्ताने रात्री बाहेर जेवायला जाणं औरंगाबादमधील एका जोडप्याला (Aurangabad couple) चांगलंच महागात पडलं. संध्याकाळी जेवण्यासाठी म्हणून बाहेर गेलेल्या या जोडप्याच्या घरावर चोरट्यांनी पाळत ठेवली असावी. रात्रीनंतर त्यांच्या घरावर डल्ला मारला. मध्यरात्रीनंतर घरी आल्यानंतर कडीकोयंडा तोडलेल्या (Theft in house) अवस्थेत दिसला. घरातलं सामानही अस्ताव्यस्त पडलेले होते. तसेच घरातील सोन्याचे दागिने आणि इतर मोबाइलही चोरीला गेल्याचे दिसून आले. शहरातील न्यू हनुमान नगरात हा प्रकार घडला. पुंडलिक नगर पोलीस स्टेशनमध्ये याविषयीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

कधी घडली घटना?

याविषयी पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, मागील आठ महिन्यापासून न्यू हनुमान नगर परिसरात किरायाच्या खोलीत एक तरण आणि तरुणी एकत्र राहतात. हे दोघे 11 मार्च रोजी जेवण करण्यासाठी म्हणून बाहेर गेले.

# हिरोईन आहे की पक्की चोर?

## बयेनं चोरीचा हिशेबही लिहून ठेवलाय, अभिनेत्री रुपा दत्ताचे एकसे एक कारनामे



कोलकाता : एकेकाळी प्रख्यात दिग्दर्शक अनुराग कश्यप (Anurag Kashyap) याच्यावर आक्षेपार्ह मेसेज पाठवल्याचा आरोप करणारी अभिनेत्री रुपा दत्ता (Rupa Dutta) अडचणीत आली आहे. पश्चिम बंगालमधील कोलकाता आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळाव्यात खिसा कापल्याच्या आरोपाखाली (pickpocketing) रुपाला कोलकाता येथे अटक करण्यात आली आहे. पोलिसांना रुपाच्या बॅगमध्ये 65 हजार 760 रुपये सापडले, ज्याबद्दल ती कोणतंही समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. चौकशी केली असता, तिने पुस्तक प्रदर्शनातील गर्दीत खिसे कापल्याची कबुली दिली. धक्कादायक म्हणजे आपण हे पहिल्यांदाच केलं नसल्याचंही तिने सांगितलं. पोलिसांना तिच्या बॅगेत एक डायरी देखील सापडली आहे. ही डायरी तिने चोरीचा हिशोब ठेवण्यासाठी वापरली होती.

रुपाकडे सापडलेल्या डायरीत कोलकात्यातील काही गर्दीच्या ठिकाणांची नावे आहेत. ही नावं कदाचित रुपा सामान्यपणे टार्गेट करत असेल, असं हिंदुस्थान टाईम्सच्या अहवालात म्हटलं आहे.

**नेमकं काय घडलं?**

अभिनेत्री रुपा दत्ता शनिवारी पुस्तक प्रदर्शनाच्या मैदानात डस्ट बिनमध्ये काही मनीबॅग टाकताना आढळली होती. तिच्या हालचालींवरुन पोलिसांना संशय आला. त्यानंतर पोलिसांनी तिच्या बॅगमधून अनेक बॅग जप्त करून तिला अटक केली.

**बॅगमध्ये 65 हजार सापडले**

पोलिसांना रुपाच्या बॅगमध्ये 65 हजार 760 रुपये सापडले. त्याबद्दल विचारणा केली असता ती पोलिसांना समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. अखेर तिने पुस्तक प्रदर्शनातील गर्दीत खिसे कापल्याची कबुली दिली.

**डायरीत चोरीच्या नोंदी**

पोलिसांना तिच्या बॅगेत एक डायरी सापडली आहे. ही डायरी तिने चोरीच्या नोंदी ठेवण्यासाठी वापरली होती. कोलकाता आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळाव्यात खिसा कापल्याच्या आरोपाखाली रुपाला कोलकाता येथे अटक करण्यात आली आहे.

**अनुराग कश्यपवर आरोप**

याआधी रूपा दत्ता चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता अनुराग कश्यप यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केल्यामुळे चर्चेत आली होती. रूपा दत्ताने अनुराग कश्यपवर केवळ लैंगिक छळाचाच नव्हे तर ड्रग्ज घेण्याचाही आरोप केला होता.

## धक्कादायक! राष्ट्रपती पदक मिळविण्यासाठी सेवापुस्तकात केल्या बनावट नोंदी





गणेश अशोक जगताप (नेम. विशेष शाखा), नितेश अरविंद आयनुर (नेम. गोपनीय शाखा), रविंद्र धोंडीबा बांदल (नेम. इमारत शाखा, आयुक्त कार्यालय) व अन्य काहींवर गुन्हा दाखल आहे. याबत संतोष प्रतापराव भोसले (वरिष्ठ लिपिक, परिमंडळ ५) यांनी तक्रार दिली आहे. हा प्रकार २६ जुलै २०१७ ते २९ जानेवारी २०२० या कालावधीत घडला.

## बाइक हळू चालवण्यास सांगणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकावर जीवघेणा हल्ला

धुळे: मोटारसायकलचा धक्क लागल्याच्या कारणावरून शहरातील बारापत्थर चौक परिसरात पोलीस उपनिरीक्षक मुस्तफाबेग इसाबेग मिर्झा यांच्यावर चाकूने वार करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. जखमी मिर्झा यांच्यावर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे पोलीस वर्तुळात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत हल्लेखोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे काम शहर पोलीस ठाण्यात सुरू होते. शहरातील चाळीसगाव रोड परिसरातील रहिवासी व सध्या महामार्ग पोलीस मदत केंद्र शिरपूर येथे कर्तव्यावर असलेले मुस्तफाबेग इसाबेग मिर्झा हे शुक्रवारी रोजी सुटीवर घरी आले होते.

# शेतीचं कर्ज फेडायचं कसं? नैराश्यातून तिनं जीवन संपवलं, औरंगाबादेत शेतकरी पत्नीच्या आत्महत्येनं हळहळ



औरंगाबादः वारंवार उद्भवणाऱ्या नापिकीमुळे नैराश्य आल्याने शेतकरी पत्नीने (Farmer Wife Suicide) आयुष्यच संपवल्याची खळबळजनक घटना औरंगाबादेत घडली आहे. जिल्ह्यातील सोयगावातील (Aurangabad Soygaon) डाभा शिवारात ही दुर्दैवी घटना घडली. मंदाबाई मनोबर दांडगे असं शेतकरी पत्नीचं नाव असून शनिवारी रात्रीतून त्या घरातून गायब झाल्या. रविवारी सकाळी कुटुंबियांनी त्यांची शोधाशोध सुरु केली असता, शेतातील विहिरीत मंदाबाई यांचा मृतदेह तरंगत (Suicide in Well) असलेला आढळून आला. कुटुंबियांनी सदर घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना दिली. फर्दापूर पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

**कर्जाच्या टेंशनमुळे सतत चिंतेत**

याविषयी सोयगावचे स्थानिक पत्रकार भारत पगारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेतकरी पत्नी असलेल्या मंदाबाई मनोहर दांडगे यांच्या पतीच्या नावे डाभा शिवारातील गट क्रमांक 5 मध्ये शेती आहे. त्यांच्या पत्नीने ग्रामीण बँक व बुलडाणा येथील बँक यांचे कर्ज घेतलेले होते. शेतात सतत नापिकी होत असल्याने हे कर्ज आपल्या नवऱ्याने कसे फेडावे याबद्धल घरात रोजच किरकिर होत असे. घरातील पाच ते सहा जणांचे जीवन शेतीवर होते. त्यात कोरोना संकटामुळे घरात कोणत्याही प्रकारचा रोजगार नाही, काय करावे समजत नसे. या दररोजचच्या कटकटीतून परमेश्वर तरी बाहेर काढेल व मार्ग निघेल, या विचारात मंदाबाई असायच्या, अशी माहिती कुटुंबियांनी दिली. दरम्यान, मार्च महिना असल्याने बँकेनेही कर्जाचे हप्ते भरण्यासाठी तगादा लावला होता. या विषयावर घरात रोजच चर्चा चालायची परंतु उत्तर काहीच मिळत नव्हते. त्यातच घरात लग्नाच्या वयाचा मुलगा असल्याने त्याच्या लग्नाचेही टेंशन होते. अखेर गरीबीमुळे स्वतःला संपवून टाकण्याचे विचार मंदाबाई करायच्या, अशी माहिती कुटुंबियांनी दिली.

**सकाळी विहिरीत सापडला मृतदेह**

मंदाबाईंनी कर्ज आणि नापिकीला कंटाळून आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज बांधण्यात आला आहे. कुटुंबियांनी सांगितल्याप्रमाणे, शनिवारी 12 मार्च रोजी रात्री घरातील सर्व जण झोपेत असताना, कर्जाला कंटाळून मंदाबाई हिने डाभा शिवारातील गट क्रमांक 54 मधील विहीरीत उडी घेत आपली जीवन यात्रा संपवली. ही घटना सकाळी त्यांच्या मुलास रविवारी सकाळी शोधाशोध केली असता समजली. याप्रकरणी फर्दापूर पोलीस स्टेशन एपीआय अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस पंचनामा केला करण्यात आला. तसेच सावळद बारा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शवविच्छेदन करण्यात आले. पुढील तपास पीएसआय कासले व पो. हवालदार बागुलकर रवींद्र करीत आहेत.

## कौटुंबिक वाद टोकाला, प्राध्यापक नवऱ्याकडून पत्नीची राहत्या घरी निर्घृण हत्या

यवतमाळ : पतीने पत्नीची हत्या (Wife Murder) केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पतीने राहत्या घरी पत्नीवर चाकूने वार केल्याचा आरोप आहे. धक्कादायक म्हणजे आरोपी पती हा व्यवसायाने प्राध्यापक (Professor Husband) आहे. चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या पत्नीला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार दरम्यान यवतमाळच्या (Yawatmal Crime) शासकीय रुग्णालयात विवाहितेचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.पत्नीच्या हत्येप्रकरणी मारोती अरके याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल आहे.

काय आहे प्रकरण?

पतीने चाकूने वार करत पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दारुच्या नशेत कौटुंबिक कारणावरुन पती नेहमी पत्नीला मारहाण करत असल्याचा दावा केला जात आहे. विमल अरके असे मयत महिलेचं नाव आहे. तर तिची हत्या करणारा आरोपी पती मारोती अरके हा पेशाने प्राध्यापक आहे.



घरातच पत्नीवर चाकू हल्ला

मारोती अरके याने रविवारी पत्नी विमल हिच्यावर राहत्या घरी चाकूने वार केले होते. पतीने केलेल्या चाकू हल्ल्यात विमल गंभीर जखमी झाली होती. जखमी अवस्थेत तिला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. यवतमाळच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असताना विमलने अखेरचा श्वास घेतला. चाकूचा वार वर्मी लागला असल्याने तिचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. आरोपी पती मारोती अरके याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुंबईत धक्कादायक घटना; लोकल ट्रेनमध्ये तरूणीवर ब्लेडने वार




मुंबई: पश्चिम रेल्वेमार्गावरील चर्नीरोड स्थानकात एका सोनसाखळी चोराने तरूणीवर ब्लेडने हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे लोकल ट्रेनमधील (Mumbai Local Train) महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्री हा प्रकार घडला. संबंधित तरूणी पश्चिम रेल्वेवरील (Western Railway) वांद्रे स्थानकातून ११.४५ वाजता लोकल ट्रेनमध्ये चढली होती. ही ट्रेन चर्चगेटच्या दिशेने जात होती. ट्रेन चर्नीरोड स्थानकात आल्यावर स्टेशनवर उभ्या असलेल्या एका चोराने महिलांच्या डब्यात प्रवेश केला. या चोराने तरुणीच्या गळ्यातील चेन खेचण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तरूणीने चोराला विरोध केला. या झटापटीत चोराने तरूणीवर ब्लेडने हल्ला केला. या हल्ल्यात संबंधित तरूणी गंभीर जखमी झाली आहे.या घटनेनंतर लोहमार्ग पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. परंतु, यानिमित्ताने मुंबईतील लोकल ट्रेन महिलांसाठी पुरेशा सुरक्षित नसल्याचे सिद्ध झाले आहे.

# 45 लाख लूट प्रकरणी पुणे येथील तीन पोलिसांसह चौघांना अटक




औरंगाबाद येथील रामलाल मोतीलाल परमार हे 8 मार्च रोजी आपल्या ब्रिझा कारमधून नाशिक येथून व्यापाऱ्याची हवाला व्यवहारातील 5 कोटी रुपयांची रोकड विविध बॅगमध्ये घेऊन मुंबई येथे देण्यासाठी निघाले होते. यावेळी नारपोली पोलीस ठाणे हद्दीत हायवे दिवे येथील पेट्रोल पंपावर दबा धरून बसलेल्या तीन इसमांनी कार थांबवून कारमधील 45 लाख रोकड असलेली बॅग घेऊन पोबारा केला.

भिवंडी : नाशिक मार्गे मुंबई येथे हवाला मार्गे रोख 45 लाख रुपयांची रक्कम घेऊन जाणाऱ्या कार चालकास सकाळी आठ वाजताच्या दरम्यान नाशिक मुंबई महामार्गावर एका आकोरीसह तीन पोलिसां (Three Police)नी लुटल्याची घटना घडली आहे. हायवेदिवे येथील इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर तिघा अज्ञात इसमांनी कार अडवून पोलीस असल्याचे सांगत चालकाच्या ताब्यातील 45 लाख रुपयांची रोकड (Cash) घेऊन पोबारा केला. याप्रकरणी नारपोली पोलिसांनी चारही आरोपींना अटक (Arrest) केली आहे. गुन्ह्यात समावेश असलेले तिघे पोलिस पुणे दत्तवाडी पोलीस ठाण्यात कार्यरत असून त्यांना नारपोली पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. पोलिसांनी पोलिसांविरोधात लुटमारी प्रकरणी गुन्हा दाखल केल्याने खळबळ माजली आहे.

नाशिकमधून मुंबईकडे रक्कम नेण्यात येत होती

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, औरंगाबाद येथील रामलाल मोतीलाल परमार हे 8 मार्च रोजी आपल्या ब्रिझा कारमधून नाशिक येथून व्यापाऱ्याची हवाला व्यवहारातील 5 कोटी रुपयांची रोकड विविध बॅगमध्ये घेऊन मुंबई येथे देण्यासाठी निघाले होते. यावेळी नारपोली पोलीस ठाणे हद्दीत हायवे दिवे येथील पेट्रोल पंपावर दबा धरून बसलेल्या तीन इसमांनी कार थांबवून कारमधील 45 लाख

## अहमदनगरमध्ये बारावीचा पेपर फुटला, दहा वाजताच गणिताचा पेपर उत्तरपत्रिकेसह व्हायरल




अहमदनगर : बारावी गणित (Mathematics) विषयाचा पेपर फुटल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. सकाळी 10 वाजताच गणिताचा पेपर उत्तरपत्रिकेसह (Answer sheet) सोशल मीडियावर व्हायरल झाला असल्याची चर्चा रंगत आहे. शिक्षणाधिकारी श्रीगोंद्यात दाखल झाले आहेत. कुठल्या परीक्षा केंद्रावरून पेपर फुटला याचा तपास सध्या सुरू आहे. मात्र, सकाळी 10 वाजताच उत्तरपत्रिकेसह पेपर सोशल मीडियावर (Social media) बघितल्यानंतर आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मात्र, या पेपर फुटीचा विद्यार्थ्यांना काय फटका बसतो हे पाहण्यासारखे आहे.

काही वेळे अगोदरच राज्याच्या शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी विधानपरिषदेमध्ये माहिती देत असताना सांगितले होते की, राज्यामध्ये कुठेही पेपर फुटला नाहीये.

# वृद्ध झोपलेल्या झोपडीला लागली आग, नंतर घडलं हे विपरीत



नवी मुंबई : गेल्या काही दिवसात नवी मुंबईतील आगीच्या (Fire) घटनेत वाढ झाली आहे. काल नवी मुंबईत अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. काल दुपारी करंजाडे कॉलेज फाटा येथील सेक्टर 2 ए मध्ये एका झोपडीला अचानक आग लाग्याने खळबळ उडाली. एक्सिस बँकेच्या (Axis Bank) मागील बाजूस ही भीषण घटना घडली आहे. संपूर्ण परिवार हादरून गेला आहे. कारण या झोपडीत एका इसमाचा जागीच होरपळून मृत्यू झाला आहे. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ही आगीची घटना कशी घडली याबाबत मात्र अधिक महिती मिळू शकली नाही. ही घटना कशी घडली याचा शोध सध्या पोलीस प्रशासन (Navi Mumbai Police) घेत आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आलेली नाही.

आगीत होरपळून वृद्धाचा मृत्यू

या आगीत मृत्यू झालेल्या वक्तीचे नाव सादिक विदिक शेख आहे. ते या झोपडीत झोपले असतानाच ही दुर्दैवी घटना घडली आहे. 65 वर्षीय वय असलेले शेख या आगीतून बाहेर पडण्यात अयशस्वी ठरले. शिवाय वेळीच कोणतीही मदत न मिल्याने त्यांची झुंज अपयशी ठरली आहे. त्यांना योग्य वेळी मदत मिळाली असती तर ही घटन टाळता आली असती. आगीच्या अशा अनेक घटना गेल्या काही दिवसांत घडल्या आहेत. त्यात अनेक ठिकाणी जीवीतहानीही झाल्याचे समोर आले आहे. मात्र कालच्या घटनेत एका वृद्धाचा मृत्यू झाल्याने ही घटना सर्वांच्याच मनाला चटका लावून गेली आहे. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मदत पोहोचायला उशीर

या भीषण आगीने एका व्यक्तीचा जीव तर घेतलाच आहे. मात्र या आगीत सामानाचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे. अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे.

# स्वीगी बॉयचा प्रताप; गळ्यावर चाकू ठेवून केली सव्वा दहा लाखाची लूट

## ऑनलाइन मागवलेले खाद्य पदार्थ देण्यासाठी आलेल्या स्वीगी बॉयने महिला घरात एकटीच असल्याचे पोहून चाकूचा धाक दाखवत १० लाख २० हजारांचा माल लंपास केला.

ठाणे: घरी एकटे आहात... भूक लागली आहे.. काही खायला ऑनलाईन ऑर्डर करताय.. तर सावधान.. कारण ठाण्यात ऑनलाईन ऑर्डर घेऊन आलेल्या एका तरुणाने पाणी पिण्याच्या बहाण्याने घरात घुसून चाकूचा धाक दाखवत सोने, चांदी आणि हिऱ्याचे दागिने आणि काही रोकड असा एकूण १० लाखाहून अधिकचा मुद्देमाल लुबाडून पोबारा केल्याची घटना घडली आहे. भर दिवसा ही घटना घडल्यामुळे परिसरात एकच घबराटीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नौपाडा पोलीस करत आहेत.

सध्या सगळीकडे ऑनलाईनचा जमाना आला आहे. सुईपासून ते मशीनपर्यंत आणि किराणापासून ते खाद्य पदार्थांपर्यंत सर्व वस्तू घरबसल्या मोबाईलवरून




मागवता येतात. त्यामुळे आजकाल बहुतेक जण विविध हॉटेलमधून खाद्य पदार्थ स्वीगी किंवा झोमॅटोच्या माध्यमातून ऑनलाईन ऑर्डर करतात. ठाण्यातील नौपाडा येथील पाचपाखाडी परिसरातील ३९ वर्षीय एका महिलेने देखील अशा प्रकारे घरबसल्या स्वीगीच्या माध्यमातून ऑनलाईन खाद्य प्रदार्थ ऑर्डर केली. काही वेळाने स्वीगी बॉय ही ऑर्डर घेऊन महिलेच्या घरी पोहचला. त्यानंतर महिला घरी एकटीच असल्याचा अंदाज घेत, या स्वीगी बॉय ने महिलेकडे पिण्यासाठी पाणी मागितले. महिला पाणी आणण्यासाठी किचनमध्ये गेली असता या स्वीगी बॉयने घरात घुसून महिलेच्या गळ्यावर चाकू ठेवला आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिली. चाकूचा धाक दाखवत या स्वीगी बॉयने महिलेला बेडरूममध्ये नेवून कपाटात ठेवलेले सोन्या – चांदीचे आणि हिऱ्याचे दागिने तसेच काही रोक रक्कम असा एकूण १० लाख २० हजारांचा मुद्देमाल लुबाडून तेथून पोबारा केला.

९ मार्च रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. नौपाडा परिसर हा ठाणे रेल्वे स्थानक जवळ असलेला परिसर आहे. अशा शहरी भागात हाय प्रोफाईल सोसायटीमध्ये दिवसाढवळ्या अशा प्रकारची घटना घडल्यामुळे परिसरात एकच भीतीदायक वातावरण पसरले आहे. घटना घडल्यानंतर महिलेने या प्रकरणी ठाण्यातील नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत महिलेची तक्रार नोंदवून घेतली.

# औरंगाबादेत पुन्हा राडा, 8 ते 10 जणांच्या टोळक्याची तरुणाला मारहाण





शहरातील अनेक ठिकाणी नशा करणाऱ्या तरुणांचे अड्डे असून नशेबाजांकडून खून, हाणामाऱ्याच्या घटना घडत आहेत, असे सातत्याने समोर येत आहे. मात्र या प्रकारांवर आळा घालण्यात पोलीस अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे.

औरंगाबादः तीन दिवसांपूर्वीच औरंगाबादमधील सातारा परिसरात एका टोळक्याने तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा असाच राडा (Aurangabad Rada) झाल्याचं पहायलं मिळतंय. नुकताच झालेला हा राडा गंगापूर परिसरातील असून आधीच्या घटनेप्रमाणेच याही घटनेत एकाच तरुणावर आठ ते दहा जाणांनी हल्ला करून त्याला बेदम मारहाण (young man beaten) केल्याचं दिसंतय. या जमावापैकी प्रत्येकाच्या हातात दांडुका असून अत्यंत गलिच्छ शिवीगाळ करत हे लोक तरुणाला मारत आहेत. विशेष म्हणजे या घटनेचा व्हिडिओ तयार केला जात असल्याचं टोळक्याला माहिती असून कॅमेऱ्याकडे पाहून अधिकच मारहाण केली जात होती. औरंगाबादेत आठवडाभरातच अशा प्रकारे दहशत पसरवणारा दुसरा प्रसंग घडला असून गुंडगिरी वाढल्याचे समोर येत आहे. त्यामुळे गुन्हेगारांवर कायद्याचा वचक (Police) राहिलेला नाही, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, नुकतीच घडलेली ही घटना गंगापूर येथील असल्याची माहिती हाती आली आहे. आठ ते दहा जणांच्या जमावाने हातात चक्क दंडूके घेऊन एका तरुणाला मारहाण करायला सुरुवात केली. त्यानंतर एकानंतर एक असे, या लोकांनी लाथा-बुक्क्यांनीही त्याला मारहाण केली. ही घटना घडत असताना परिसरातील नागरिक गोळा झाले. त्यानी पोलिसांना याबाबत माहिती दिली. घटनास्थळी पोलीस दाखल झाल्यानंतर ही मारहाण थांबवण्यात आली. घटनेत मारहाण करणाऱ्या तरुणांची गंगापूर परिसरात दहशत असून त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल असल्याचेही समोर आले आहे.

# धुळ्यात भरदिवसा ‘ खाकी ‘ रक्तबंबाळ, बाईकला कट मारल्याचा वाद, PSI वर चाकूहल्ला



समोरुन येणाऱ्या दुचाकीचा कट लागल्याच्या कारणावरुन दुचाकीस्वाराने वाद घातला. त्यानंतर मागचा पुढचा विचार न करता थेट खाकीवरच घाव घातला. या हल्ल्यात पीएसआय मिर्झा जबर जखमी झाले आहेत.

धुळे : धुळे शहरात सर्वसामान्य जनता सुरक्षित नाही, अशी ओरड कायम असते. आता मात्र ज्यांच्यावर कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी आहे ती खाकीच सुरक्षिक नाही की काय, असा सवाल उपस्थित करणारी घटना समोर आली आहे. धुळ्यात (Dhule Crime) भरदिवसा खाकी रक्तबंबाळ झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी पाहिले. किरकोळ कारणावरुन एका फौजदारावर वर्दळीच्या रस्त्यावर चाकू हल्ला (Knife Attack) झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. शिरपूरचे महामार्ग पोलिस ठाण्याचे अधिकारी पीएसआय एम.आय. मिर्झा हे त्यांच्या दुचाकीने श्रीराम पेट्रोल पंपाकडून बारापत्थर रस्त्याकडे जात होते.

# वकिलानं अंगावर पेट्रोल ओतलं, नांदेड कोर्टाच्या आवारात अनर्थ टळला

नांदेडः येथील कोर्ट परिसरात (Nanded Court) आज धक्कादायक घटना घडली. न्यायाधीशांकडून अपमानास्पद वागणूक मिळतेय, असा आरोप करत एका वकिलाने (Advocate) चक्क आत्मदहनाचा प्रयत्न केला. कोर्टाच्या आवारातच वकिलाने अंगावर पोट्रोल ओतून घेतले. त्यानंतर तो आत्मदहनाचा (Self Immolation attempt) प्रयत्न करीत असतानाच पोलिसांनी वेळीच हा प्रकार रोखला. शनिवारी सकाळी घडलेल्या या घटनेतील वकिलाचे नाव जयपाल ढवळे असं आहे. सकाळी अकरा वाजेच्या सुमारास ही घटना घडली असून न्यायाधीशांकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक आता सहन होत नाहीये, असं म्हणत या वकिलाने आत्मदहनाचा प्रयत्न केला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे वातावरणातील तणाव



निवळला.

काय आहे नेमके प्रकरण?

विविध जिल्ह्यांच्या ठिकाणी आज लोकअदालत सुरु आहेत. नांदेडमध्येही जिल्हा सत्र न्यायालयात आजा लोक अदालत सुरु होती. यावेळी जयपाल ढवळे या वकिलाने अचानक न्यायाधीशांच्या वागणुकीविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आणि आत्मदहनाचा प्रयत्न केला. जयपाल ढवळे असं या वकिलाचं नाव आहे. त्यांच्या अशीलाचा खटला न्या. बांगर यांच्या कोर्टात सुरु होता. परंतु न्यायाधीश बांगर यांच्याकडून सतत अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचा आरोप ढवळे यांनी केला. यासंदर्भातले जाहीर निवेदनही त्यांनी छापून आणले होते. ढवळे यांनी सकाळी अंगावर पेट्रोल ओतून घेतले. मात्र वजीराबाद पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने वेळीच धाव घेत हा प्रकार थांबवला. त्यानंतर ढवळे यांना पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले.पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर प्रकरण निवळले दरम्यान, वकील ढवळे यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्यानंतर पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला आणि हे प्रकरण निवळलं. न्यायालयाच्या परिसरात एखाद्या वकिलानेच न्यायाधीशांच्या विरोधात अशा प्रकारचे आंदोलन केल्याची ही घटना या परिसरात पहिल्यांदाच घडली.

# मुंबईत 1 कोटी 95 लाख रुपयांच्या चरससह एका आरोपीला अटक



अटक करण्यात आलेल्या आरोपी विजय चौहान हा यूपीतून मुंबईत चरसचा व्यापार करण्यासाठी मुंबईत आला होता. आरोपी दहिसर चेक नाक्याजवळ चरस घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितनुसार दहिसर पोलिसांनी चेक नाक्याजवळ सापळा रचला.

मुंबई : मुंबईच्या दहिसर पोलिसांनी 1 कोटी 95 लाख 18 हजार किंमतीच्या 6 किलो 560 ग्रॅम चरस (Charas)सह एका आरोपीला अटक (Arrest) केली आहे. विजय चौहान (32) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो मुंबईतील मालवणी येथे राहतो. सध्या पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, आरोपीशी आणखी किती लोक संबंधित आहेत ? कधीपासून हा चरसचा व्यवसाय करत होता, याबाबत पोलिस पुढील तपास करीत आहेत. हा आरोपी यूपीच्या कानपूर येथून चरसचा व्यापार करण्यासाठी मुंबईत आले होते.पोलिसांनी दहिसर चेकनाक्यावर सापळा रचून आरोपीला अटक केली अटक करण्यात आलेल्या आरोपी विजय चौहान हा यूपीतून मुंबईत चरसचा व्यापार करण्यासाठी मुंबईत आला होता. आरोपी दहिसर चेक नाक्याजवळ चरस घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितनुसार दहिसर पोलिसांनी चेक नाक्याजवळ सापळा रचला. आरोपी ठरल्याप्रमाणे चरस घेऊन दहिसर चेक नाक्याजवळ आला असता पोलिसांनी करोडो रुपयांच्या चरससह आरोपीला रंगेहाथ पकडले. पोलिस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत. महिनाभरापूर्वी दहिसर परिसरातून दोन ड्रग्ज तस्करांना पोलिसांनी अटक केली होती. त्यांच्याकडून 3 किलोपेक्षा जास्त गांजा जप्त करण्यात आला होता.मुंबईत याआधीही पोलिसांनी ड्रग्ज जप्त केलेमुंबईत याआधीही अंमली विरोधी पथकाने वडाळा परिसरात कारवाई करत 39 लाख 63 हजार रूपयांचे ड्रग्स जप्त केले होते. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली होती. आरोपींकडून 1 किलो 321 ग्रॅम चरस जप्त करण्यात आले होते.

# नाल्यात पोहताना दोन विद्यार्थी बुडाले

भंडारा : सकाळच्या सत्रातील शाळा सुटल्यानंतर मित्रांसोबत नाल्यावर पोहायला गेलेल्या दोन विद्यार्थ्यांचा बुडून (Students Drown) मृत्यू झाला. भंडारा जिल्ह्यात (Bhandara) साकोली लगतच्या सेंदुरवाफा येथे घटना उघडकीस आली आहे. शोध मोहिमेनंतर रात्री उशिरा मुलांचे मृतदेह सापडले आहेत. धवल रामू परशुरामकर (वय 11, रा. सेंदुरवाफा) आणि भावेश अशोक भोंडे (रा. प्रगती कॉलनी) अशी मृत विद्यार्थ्यांची नावं आहेत. दोघंही नवजीवन कॉन्व्हेंटमध्ये पाचव्या वर्गात शिकत होते. त्यांच्या अकाली मृत्यूने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चिमुकल्यांनी जगाचा निरोप



घेतल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.शुक्रवारी सकाळच्या सत्रातील शाळेत धवल सायकलने गेला होता, सकाळी 11 वाजले तरी तो घरी परत आला नाही,त्यामुळे त्याचा शोध सुरू झाला. काही वेळात प्रगती कॉलनीजवळ असलेल्या नाल्याजवळ एक सायकल असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पालकांसह पोलिसांनी तेथे धाव घेतली.

# कंत्राटदारास काढायचे होते कामाचे बिल, अभियंत्यासह लिपिक अडकले एसीबीच्या जाळ्यात

अमरावती : अमरावतीच्या सार्वजनिक बांधकाम (Public Works) (आदिवासी) विभागाच्या एका कार्यकारी अभियंत्यासह वरिष्ठ लिपिकास रंगेहाथ अटक करण्यात आली. एका बांधकाम कंत्राटदाराचे कामाचे बिल काढून दिल्याच्या मोबदल्यात लाच मागितली होती. अभियंता सुनील रामदास कळमकर व वरिष्ठ लिपिक राजेश जनार्दन गुडधे अशी अटक करण्यात आलेल्या लाचखोरांची नावे आहेत. या प्रकरणातील तक्रारकर्ते यांचे मामा शासकीय कंत्राटदार (Government Contractor) आहेत. त्यांनी केलेल्या एका कामाचे बिल काढून दिल्याच्या मोबदल्यात कार्यकारी




अभियंता सुनील कळमकर (Engineer Sunil Kalmakar) यांनी 50 हजार व वरिष्ठ लिपिक राजेश गुडधे यांनी 10 हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

**एसीबीच्या पथकाने रचला सापळा**

यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात आली होती. तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने काल सायंकाळी कार्यालयातच सापळा रचला. यावेळी तक्रारकर्त्याच्या मामाकडून 50 हजारांची लाच स्वीकारताना कार्यकारी अभियंता सुनील कळमकर व पाच हजारांची लाच स्वीकारताना वरिष्ठ लिपिक राजेश गुडधे यांना रंगेहाथ अटक केली. अमरावतीमध्ये एका कंत्राटदारास कामाचे बिल काढायचे होते.

त्यासाठी त्याला अभियंत्याने लाचेची मागणी केली. कंत्राटदाराने एसीबीकडे तक्रार केली. या प्रकरणात अभियंता आणि लिपिक एसीबीच्या जाळ्यात अडकले.

# गर्भवती महिलेवर बलात्कार करत तिघांची हत्या, ब्रिटनमधील 'त्या' नराधमाला जन्मठेप

ब्रिटन : ब्रिटनच्या वेस्ट मिडलँड्स (West Midlands)मध्ये गर्भवती महिलेवर बलात्कार करून तिच्यासह तिघांची हत्या करणाऱ्या नराधमाला ब्रिटनमधील वॉर्विक क्राउन न्यायालयाकडून जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या आरोपीने सहा दिवसात तिघांच्या हत्या केल्या होत्या. अँथनी रसेल (Anthony Russell) असे या आरोपीचे नाव आहे. तर ज्युली विल्यम्स (58), त्याचा मुलगा डेव्हिड विल्यम्स (31) आणि निकोल मॅकग्रेगर (31) अशी हत्या करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. नराधमाने सहा दिवसात या तिघांची हत्या केली होती. अँथनी रसेलला 2020 मध्ये निकोल मॅकग्रेगरवर बलात्कार केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले. निकोल त्यावेळी 5 महिन्यांची गर्भवती होती. बलात्कारानंतर रसेलने निकोलची गळा दाबून हत्या केली होती. वॉर्विक क्राउन कोर्टात शिक्षा सुनावताना न्यायमूर्तींनी ही ‘असाधारण गंभीर’ बाब



असल्याचे म्हटले होते.

**तिघेही अचानक बेपत्ता आणि काही दिवसांनी मृतदेह सापडले**

मयत ज्युली विल्यम्स यांनी 23 ऑक्टोबर 2020 रोजी आपला मुलगा डेव्हिडच्या हरवल्याची तक्रार दाखल केली होती. दोन दिवसांनंतर, ज्युली बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांच्या बहिणीने पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांना ज्युलीचा मृतदेह सापडला. त्यांच्या शरीरावर 100 हून अधिक जखमा होत्या. यानंतर पोलिसांनी डेविडचाही मृतदेह सापडला. या हत्याकांडानंतर अँथनीने लूट करुन शहरातून पळ काढला. लेमिंग्टन शहरात आल्यानंतर काही तासांनी त्याने निकोल मॅकग्रेगरवर बलात्कार करत तिची हत्या केली. काही दिवसांनी निकोलचा मृतदेह घनदाट जंगलात सापडला. तिच्या शरीरावर अनेक जखमांच्या खुणा होत्या.

**पुण्यात धारदार शस्त्राने वार करत इसमाची आत्महत्या**

पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील कावळ पिंपरी येथे 9 तारखेला मध्यरात्री अज्ञात आरोपींनी धारदार शस्त्राने वार करत एका इसमाची निर्घृणपणे हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. रोहिदास पाबळे (38) असे हत्या करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. या प्रकरणाचा पुणे ग्रामीण पोलिसांनी कसून तपास करत स्थानिक गुन्हे शाखा आणि नारायणगाव पोलिसांनी या हत्येचा 24 तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. कुणाल बोरुडे आणि सुफियान आतार अशी अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींची नावे आहेत.

# पुण्यात निवृत्त आयपीएस अधिकाऱ्यानेच हडपले बिटकॉइन



पुणे – देशात डिजिटल क्रिप्टो करन्सीने (cryptocurrency) अनेकांची फसवणूक केली आहे. पुण्यात (Pune) याचा क्रिप्टो करन्सीच्या माध्यमातून निवृत्त आयपीएस अधिकाऱ्याने मोठा घोटाळा केल्याचे उघड झाले आहे. क्रिप्टो करन्सीशी संबंधित देशात नोंदवण्यात आलेल्या पहिल्या गुन्ह्यात, जप्त करण्यात आलेले बीटकॉईन (Bitcoin) परस्पर आपल्या खात्यात वळती करून घेतल्याची घटना उघड झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या गुन्हयात तपासासाठी तांत्रिक मदत करणाऱ्या दोन तपास अधिकाऱ्यांनीच हे कृत्य केलं आहे. याप्रकरणी पुणे सायबर पोलिसांनी दोन संगणकतज्ञ पंकज प्रकाश घोडे (वय 38, रा. ताडीवाला रोड) आणि सेवानिवृत्त पोलीस अधिकारी रवींद्रनाथ प्रभाकर पाटील (वय 45, रा. बिबवेवाडी) याना अटक केल आहे. या दोघांनी तब्बल 20 कोटी रुपयांचे बिटकॉइन हडप केल्याचं समोर आलं आहे.

**तांत्रिक तज्ज्ञ म्हणून काम करताना केली फसवणूक**

पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत 2018 मध्ये क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणुकीच्या बहाण्याने बऱ्याच जणांना फसविणाऱ्या आरोपींविरुध्द दत्तवाडी पोलीस ठाणे आणि निगडी पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंद झाली होती. क्रिप्टो करन्सी संदर्भात पहिला गुन्हा पुणे शहरात 2018 मध्ये दाखल झाला होता. या गुन्ह्यातील कोट्यवधी रुपयांचे आभासी चालन जप्त करण्यात आले होते.



## संपादकीय...

# उद्ध्वस्त धर्मशाळेचे बांधकाम

लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा लागोपाठ दुसरा मोठा पराभव झाल्यानंतर २०१९ मध्ये तेव्हाचे अध्यक्ष राहुल गांधी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. तेव्हापासून, एकीकडे काँग्रेस नेतृत्वविहीन आहे आणि दुसरीकडे, पक्षाच्या सर्वोच्च सत्तारचनेत मात्र काहीच बदल झालेला नाही. हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांची प्रकृती म्हणावी तितकी बरी नाही आणि त्यांनी आपली दमदार राजकीय खेळी पुरीही केली आहे. अशा वेळी, विविध निवडणुकांमधील पराभव, अनेक नेत्यांच्या राजीनाम्यांनी पक्षाला लागलेली गळती आणि रस्त्यावर उतरून आंदोलने करण्यात येणारे अपयश या साऱ्यांमुळे एक गंभीर राजकीय पर्याय ही काँग्रेसची प्रतिमा झपाट्याने लयाला जात आहे. नुकताच पाच राज्यांमध्ये झालेला दारूण पराभव ही केवळ काँग्रेससाठी दु:खद बाब नाही, तर देशातील निकोप संसदीय लोकशाहीच्या दृष्टीनेही ती मुळीच हितावह बाब नाही. प्रश्न असा आहे, की काँग्रेसच्या सर्वोच्च आणि इतर नेत्यांना आपल्यावरच्या या




ऐतिहासिक जबाबदारीची काही जाणीव उरली आहे का? नसेल तर त्यांनी सरळ पक्ष सामान्य कार्यकर्ते व निष्ठावान नेत्यांच्या हाती सोपवून घरी जावे आणि आपले जगप्रवासाचे किंवा इतर छंद पुरे करावेत. काँग्रेसचे भवितव्य आणि गांधी घराणे यांची सांगड जोवर तुटत नाही, तोवर पक्षाला पुढची वाट दिसणे कठीण आहे. हा केवळ घराणेशाहीचा मुद्दा नाही. डॉ. मनमोहनसिंग यांच्या कारकिर्दीची सलग दहा वर्षे आणि नंतरची आठ वर्षे अशा दीड तपाच्या कालावधीत राहुल गांधी यांना आपले नेतृत्व सिद्ध करता आलेले नाही. प्रियांका गांधी हे काँग्रेसचे कसोटीच्या क्षणी वापरण्याचे ब्रह्मास्त्र आहे, अशी उगाचच समजूत करून देण्यात आली होती. तिच्यात कितपत तथ्य होते, हे उत्तर प्रदेशात समजलेच आहे.

पक्षाची इतकी जराजर्जर अवस्था असूनही राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत हे कार्यकारिणीच्या बैठकीच्या आधीच राहुल यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत होते. दुसरीकडे, पक्षहितासाठी काम करणाऱ्या जी-२३ या लोकनेते नसलेल्या नेत्यांच्या हालचालींनाही वेग आला आहे. पाच राज्यांमध्ये काँग्रेसचे कार्यकर्ते लढत होते, तेव्हा यातील किती नेत्यांनी घाम गाळला आणि आपल्या खिशात हात घातला, हेही पाहावे लागेल. निकाल लागून अपयश आले, की हे २३ नेते जागे होतात आणि परत पुढच्या पराभवापर्यंत अंतर्धान पावतात. मग त्यांचे तथाकथित बंड पक्ष वाचविण्याचे गंभीर प्रयत्न आहेत, हे तरी कसे मानावयाचे? परवा कर्नाटकातील ज्येष्ठ काँग्रेस नेते सी. एम. इब्राहिम यांनी पक्षाचा राजीनामा दिला. त्यांना या नेत्यांनी का थांबवले नाही? त्याआधीही ज्योतिरादित्य शिंदे यांच्यापासून अनेक नेते दर काही दिवसांनी पक्ष सोडून जात आहेत. त्यांच्या नाराजीवर पक्षात चर्चा होते की नाही? आसामचे सध्याचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वशर्मा यांनी मध्यंतरी काही आक्षेपार्ह विधाने केली खरी; पण पक्ष सोडण्याचे त्यांनी दिलेले एक कारण किती गंभीर होते! ते दिल्लीत गेले असताना, त्यांचे ऐकून घेण्याऐवजी पाळीव कुत्र्याला भरविण्यात त्यांच्या नेत्याला अधिक रस होता. राष्ट्रीय पक्ष असे चालत नाहीत. आमदार किंवा अगदी नगरसेवकालाही लोकांची कामे निपटताना दिवसाचे २४ तास अनेकदा कमी पडतात. मग राहुल गांधी अनेक आठवडे राष्ट्रीय रंगमंचावरून अचानक गायब कसे होतात? अनुकूल स्थिती असतानाही पंजाब काँग्रेसची गेल्या वर्षभरात नेत्यांनी पुरती वाट लावली. इतकी की, नवज्योत सिद्धू त्याचेच कंत्राट घेऊन पक्षात शिरले आहेत, असे वाटावे.

या पार्श्वभूमीवर आपल्या पक्षाचे 'नेहरू-गांधी पर्व' आता संपले आहे, याची खूणगाठ बांधून कार्यकर्ते व नेते यांनी हा ऐतिहासिक पक्ष नव्याने बांधायला घ्यावा. भारताचा आणि काँग्रेसचाही इतिहास देदीप्यमान आहे. कोणताही देश किंवा पक्ष एका घराण्याच्या पुण्याईवर किंवा कर्तबगारीवर अनंत काळ चालू शकत नाही. 'रामकृष्णही आले गेले, त्याविण का जग ओसचि पडले?' काँग्रेसच्या उद्ध्वस्त होत चाललेल्या धर्मशाळेच्या दरवाजावर इतिहासपुरुष पुन्हा पुन्हा दस्तक देतो आहे. पक्षाला जागे करण्याचा प्रयत्न करतो आहे. ही हाक गांधी कुटुंब व इतर नेते ऐकत आहेत का? केंद्र सरकारवर तुटून पडा आणि त्याच्यावर अंकुश ठेवा; पण त्यासाठी आधी आपल्या घराचे कोसळते वासे तोलून धरा. प्रत्येक पराभवानंतर अहवाल तयार करून अथवा सोनिया गांधी यांना पत्रे पाठवून काहीही होणार नाही. आजही देशात काँग्रेस पक्ष सर्वदूर पसरला आहे. हजारो निष्ठावान कार्यकर्ते आहेत.

# निकालांनंतर स्वीकारण्याची सत्ये..

कोणत्याही पराजिताची आपल्या पराभवाची कारणमीमांसा करण्याची एक पद्धत असते. बहुतांश वेळा ती ठरलेली आणि पराभव नाकारणारी असते. पण मोठ्या लढाईची तयारी करायची असेल तर सगळ्यात आधी पराभव स्वीकारण्याची तयारी दाखवायला हवी..

'पोटात जोराचा गुद्दा मारल्यासारखं वाटतंय' अशीही एक प्रतिक्रिया मला आलेल्या व्यक्तिगत संदेशांमध्ये होती. उत्तर प्रदेशासह अन्य चार राज्यांच्या निवडणूक निकालाबद्दलचे हे खासगीतले भाष्य. ते इथे सांगण्याचे कारण म्हणजे त्यातील प्रामाणिकपणा. ही भावनिक प्रतिक्रिया म्हणून सोडूनही देता येईल, पण कदाचित असा जोराचा गुद्दाच आपणा सर्वांना भानावर आणण्यासाठी गरजेचा होता. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल किंवा शेतकरी आंदोलनाचे यश यावर आपण समाधान मानू शकत नाही, याची आठवण करून दिली जाणे आवश्यकच होते. एरवीही २०२४ चा मार्ग खडतरच होता, पण ताज्या निकालांमुळे तो आणखी अवघड झाल्याची जाणीव ठेवायला हवी. तरीसुद्धा जर भविष्य अंधकारमय असू नये असे वाटत असेल, तर चार धडे आपण शिकलेच पाहिजेत.

पहिला धडा कटू सत्य स्वीकारण्याचा. या निवडणुकीत हार झाली, ती केवळ निवडणूक लढवणाऱ्या पक्षांची नव्हे. समाजवादी पक्षाने हातची निवडणूक घालवली, काँग्रेसने लढतसुद्धा धड दिली नाही आणि बहुजन समाज पक्ष आता वाताहतीकडेच जाणार किंवा पंजाबातील प्रस्थापित राजकारणच गडगडले आहे हे सारे खरेच; पण या साऱ्यांबरोबरच, या निवडणुकीकडून काहीएक आशा ठेवणाऱ्या आपणा सर्वांचेच नुकसान झाले आहे. आपल्या या आशा कसल्या होत्या, हे आपल्याला चांगलेच माहीत आहे आणि 'आपण' म्हणजे कोण हेसुद्धा. लोकशाही प्रजासत्ताकाच्या संकल्पनेवर विश्वास असणारे, त्यासाठी राज्यघटनेच्या सरनाम्यातील (प्रास्ताविकेतील) प्रत्येक तत्त्व आणि त्यामागचे मूल्य महत्त्वाचे आहे, असे मानणारे आणि त्यानुसार जगण्याचा प्रयत्न करणारे भारताचे लोक म्हणजे आपण. साहजिकच आपण बापूंना, भगतसिंगला आणि बाबासाहेबांना महत्त्वाचे मानतो. अशा आपणा सर्वांचा पराभव झाला आहे. निवडणूक निकालात 'घपला' असल्याच्या किंवा मतदानयंत्रांत घोटाळे झाल्याच्या तथाकथित आरोपांकडे अजिबात लक्ष न देता (समजा जरी काही आरोप खरेही निघाले, तरी पराभवाचे प्रमाण किंवा जिंकणाऱ्यांचे मताधिक्य त्याहून मोठे आहे) आणि 'मतांची टक्केवारी तर वाढली' किंवा एखादा ध्रुवीकरणवादी नेता तर पराभूत झाला, यांसारख्या उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रांवर समाधान न मानता आपल्याला हा पराभव स्वीकारावा लागेल.

दुसरे म्हणजे, आपला पराभव हा केवळ या एका निवडणुकीपुरता मर्यादित राहिलेला नाही. राज्यशास्त्रज्ञ सुहास पळशीकर म्हणतात त्याप्रमाणे, 'राजकीय संस्कृतीच पालटून टाकू शकणाऱ्या' परमप्रभाववादी (हेजिमोनिक) शक्तीशी सुरू असलेली लढाई आपण लढतो आहोत, त्यात आपली पीछेहाट झालेली आहे. भाजपच्या निवडणूक- यशामागे आत्यंतिक श्रेष्ठ अशी संवाद- संप्रेषण- संज्ञापन यंत्रणा, संघटनात्मक कार्य, 'मीडिया'वरली पकड, पैसा हे सारे आहेच. त्याला जोड म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्यक्तिगत प्रभाव आहे. राजकीय वर्चस्वाला पाठबळ केवळ राज्ययंत्रणेच्या शक्तीचे नसून रस्त्यावरल्या बाहुबळाचेही आहे आणि त्यापुढे कैक संस्थात्मक यंत्रणा नमल्या आहेत, निषेधाचे कैक आवाज बंद झालेले आहेत. त्याहीपेक्षा सांस्कृतिक अथवा विचारप्रणालीचा स्वीकार अधिक चिंताजनक, कारण या देशाच्या राजकारणात कळीचे ठरू शकणारे राष्ट्रवाद, हिंदू संस्कृती आणि सांस्कृतिक वारसा या मुद्द्यांचे अपहरण भाजपने स्वत:च्या राजकीय लाभासाठी यशस्वीपणे निभावून नेलेले दिसते. यामुळे ज्याला प्रतापभानु मेहता 'आधीपासूनचाच विश्वास' म्हणतात, तसा तयार करविण्यातही यश मिळते आणि या 'आधीपासूनच्याच विश्वासा'चा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे, कारभारातील उणिवांची चर्चा लोक करेनासे होतात. साहजिकच, 'प्रजासत्ताका'ची पीछेहाटच नव्हे तर मोडतोड सुरू होते.

यावर उपाय म्हणून काही पर्याय आहे का?


तयार पर्याय सध्या दिसत नाही, हे तिसरे सत्य. सध्याच्या परिस्थितीत तरी काँग्रेस पक्ष हा नैसर्गिक पर्याय असल्याचा दावा करू शकत नाही. त्या पक्षाचा जनाधार आजही व्यापक ठरावा इतपत आहे, दोन राज्यांतील (राजस्थान आणि छत्तीसगड) सरकारे त्या पक्षाची आहेत आणि तो पक्ष भाजपविरोधी (बिगरभाजप आणि भाजपविरोधी यांतील फरक लक्षात घेण्याजोगा) आहे. तरीदेखील हा सर्वात जुना पक्ष काही भाजपला राष्ट्रव्यापी पर्याय म्हणून आज उभा राहू शकत नाही. मग प्रादेशिक पक्ष आहेत, पण त्यांचा प्रभाव हिंदी पट्ट्याच्या बाहेरील राज्यांतच आहे आणि अन्य राज्यांत ते वाढू शकतात का याबद्दल शंकाच आहे. तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालातून गोव्यात पाय रोवण्याचा केलेला प्रयत्न नुकताच फसला आहे. जातीपातींची गणिते मांडून



'परमप्रभाववादी' शक्तींशी लढता येणार नाही, हे समाजवादी पक्षाच्या ताज्या प्रयोगाने दाखवून दिलेले आहे. अन्य राज्यात पाय रोवण्याची धमक दाखवली आम आदमी पक्षाने, पण या 'आप'कडे भाजपला नैसर्गिक आणि राष्ट्रव्यापी पर्याय म्हणून कसे काय गांभीर्याने पाहाता येणार, या प्रश्नाला भरपूर कंगोरे आहेत. त्यापैकी पहिला म्हणजे दिल्लीखेरीज अन्य राज्यांत 'तशाच्या तशा' कल्याणकारी योजना राबवायच्या तर महसुली तूटच सोसावी लागणार, मग सुशासनाच्या दाव्याचे काय? दुसरा कंगोरा म्हणजे, शेतीविषयक धोरणाची समज दाखवून द्यावी लागणारच, ती अद्याप तरी दिसलेली नाही. आणि तिसरा म्हणजे, राज्याची नजर दिल्लीकडेच हे पंजाबसारख्या स्वाभिमानी राज्यात कसे काय चालणार? या कंगोऱ्यांच्याही पलीकडला खरा मोठा प्रश्न असा की, राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याची चाड आहे की नाही, हे 'आप'ला सिद्ध करावे लागेल. हा प्रश्न महत्त्वाचा आहे, कारण 'आप' हा भाजपच्या परमप्रभाववादाला रोखू शकणारा पक्ष म्हणायचा की त्या परमप्रभावाच्या छायेतच राहून आपापल्या जागा टिपणारा म्हणायचा, हे या प्रश्नाच्या उत्तरावरच ठरणार आहे.

चौथे सत्य काहीसे सकारात्मक म्हणावे असे. आपण काही अगदीच शक्तिहीन आहोत किंवा आपल्याकडे काहीही पर्याय उरलेलेच नाहीत, असे काही नाही. '२०२४ ची चिंता नाहीच' असे मोठ्याने सांगणारे नेते खरोखरच अगदी निश्चित असतील, तर त्यांना तसे मोठ्याने सांगावे का लागते आहे बरे? तसे सांगावे लागते कारण, आज भाजपचे वर्चस्व देशभरच्या सर्व राज्यांमध्ये दिसणारे नाही, निवडणुकीत जागा कमी होऊ शकतात हे मोठ्या राज्याने दाखवून दिलेले आहे आणि विचारप्रणालींच्या लढाईत भाजपची बाजू कमजोर असल्याचे गेल्या काही वर्षांत- केवळ शेतकऱ्यांच्या आंदोलनातून नव्हे तर त्याआधीच्या नागरिकत्व फेरफारविरोधी आंदोलनातून आणि पश्चिम बंगालच्या निवडणुकीतूनही- दिसून आलेले आहे. ही दोन आंदोलने वा पश्चिम बंगालची निवडणूक यांचा एकमेकांशी काहीएक संबंध नव्हता हे खरेच, शिवाय एकंदर चळवळी वा आंदोलने आणि 'मुख्य धारे'तले राजकीय विरोधी पक्षीय, यांच्यात संवाद- सहकार्याचे पूल सध्या दिसत नाहीत हेही खरे. परंतु आपले म्हणणे अिहसकपणेच मांडणाऱ्या आणि अद्वातद्वा टीकेलाच हास्यास्पद ठरवणाऱ्या अशा अनेक कृतनिश्चयी चळवळी यापुढे होत राहातील, हे सरकारच्या धोरणांतूनच तर दिसते आहे. यापुढील काळात आर्थिक विषमता वाढणार आहे, बेरोजगारीचा प्रश्न आणखी उग्र होणार आहे आणि महागाईदेखील वाढणार आहे, यामागच्या धोरणांना, ती मागे न घेण्याच्या बेदरकारीला प्रतिरोध करणे हेही राजकारण असल्याचे आपण ओळखायला हवे.

# Wow Momos ची फ्रेंचायजी घ्यायला गेले अन् 12 लाख उडाले



औरंगाबादः कोलकत्यातील प्रसिद्ध Wow Momos ची फ्रेंजायजी घेऊन बिझनेस सुरु करुया असा प्लॅन असलेल्या व्यावसायिकाला भामट्यांनी चांगलंच गळाला लावलं. सिंधी कॉलनी परिसरातील हॉटेल व्यावसायिकाच्या बाबतीत हा प्रकार घडला. Wow Momos ची फ्रेंचायजी घ्यायला गेलेल्या व्यावसायिकाला ऑनलाइन गंडा घालण्यात आला. फेसबुकवर या फ्रेंचायजीसंबंधीची जाहिरात व्यावसायिकाने पाहिली होती. त्यानंतर औरंगाबादेतही आपण अशी शाखा सुरु करू, असा विचार त्याच्या मनात आला. त्या जाहिरातीनुसार, प्रक्रिया करत गेला. मात्र हे संकेतस्थळ बनावट (fake Website) असल्यानं भामट्यांच्या जाळात अडकत गेला. सुरुवातीला सहा लाख त्यानंतर आणखी काही लाख रुपये असे भरत गेले आणि तब्बल 12 लाखांची फसवणूक झाल्यानंतर व्यावसायिकाचे डोळे उघडले. मनात शंका आल्याने त्यांनी वेबसाइट बारकाईने पाहिली आणि ती बनावट असल्याचे उघडकीस आले. व्यावसायिकाने आता पोलिसात धाव घेतली असून तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काय घडला नेमका प्रकार?

कैलास लक्ष्मणदास तलरेजा असं फसवणूक झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. तलरेजा हे 45 वर्षीय हॉटेल व्यवसायिक आहेत. औरंगाबाद शहरातील सिंधी कॉलनीत त्यांचं हॉटेल आहे. तलरेजा यांचा बीएचआर इंडियन फूड नावानं व्यवसाय आहे. मागील वर्षी डिसेंबर 2021 मध्ये त्यांना फेसबुकवर कोलकत्याच्या वॉव मोमोजबद्दल माहिती मिळाली होती. त्यानंतर त्यांनी गूगलवरून कंपनीची माहिती मिळवली. संबंधित ईमेलवर संपक्त केला. औरंगाबाते वॉम मोमोजची शाखा सुरु करण्याची प्रक्रिया विचारून घेतली. त्यानंतर आरोपींनी तलरेजा यांच्याकडून बँक पासबूक, आधारकार्ड, पॅनकार्ड, शहर आणि शिक्षणाविषयी माहिती विचारण्यात आली. तसेच त्यांच्याकडून रजिस्ट्रेशन फॉर्मही भरून घेतला गाले. त्यांनतर 6 डिसेंबर रोजी फ्रेंचायजी घेण्यासाठी 8 लाख रुपये द्यावे लागतील, असं सांगितलं गेलं. तसेच हे पैसे काही दिवसानंतर परत मिळतील असंही सांगण्यात आलं. त्यानंतरही वेळोवेळी विविध कारणं सांगत आरोपींनी या व्यावसायिकाकडून तब्बल 11 लाख 96 हजार रुपये लुबाडल्याची तक्रार करण्यात आली आहे.

**पैसे भरले पण फ्रेंचायजीच नाही...**

दरम्यान, वॉव मोमोजची फ्रेंचायजी मिळण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरही कंपनीकडून काही प्रतिसाद मिळत नसल्याने फिर्यादी तलरेजा अस्वस्थ झाले.

# पुण्यात पोलीसांच्या नाकावर टिच्चून गुंडागर्दी, वाहनांची पुन्हा तोडफोड,

पुणे- शहारातील गुन्हेगारीचे (Crime) प्रमाण वाढत दुसरीकडं गावगुंडाचा हौदास वाढताना दिसत आहे. येरावडा परिसरातील(yerawada area) वाहनतळ येथे वाहनांची तोडफोड केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.स्थानिक नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्यासाठी गुंडांनी हे कृत्य केले आहे. या घटनेत एक चारचाकी




वाहन, 5 रिक्षा, 5 दुचाकी वाहनांचे नुकसान झाले आहे. गुंडांनी वाहनावर दगड, पालघनसारख्या हत्याराने काचा फोडल्या आहेत. एवढंच नव्हे गल्ली बोळातील वाहनावर तसेच नागरिकांच्या घराबाहेर पाण्याचे ठेवण्यात आलेलं ड्रमही फोडण्यात आल्या आहेत. सीसीटीव्हीत घटना कैद झाकी आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. या घटनेमुळे पोलिसांच्या(Pune Police ) कार्यक्षमतेवर पुन्हा प्रश्न चिन्ह उपस्थित झाले आहे.

सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

यापूर्वी धानोरी परिसरात स्थानिक गुंडांकडून धारदार सत्रांचा धाक दाखवत व्यापारी व रहिवाशांना धमकावण्यासह खंडणी मागणे, महिला व मुलींची छेडछाड कराण्यांचे प्रकार सातत्याने सुरु असल्याचे समोर आले आहे. पोलीस प्रशासनासह , स्थानिक प्रतिनिधींकडूनही याकडं दुर्लक्ष केलं जात आहे. यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्थानिक व्यापाऱ्यांना शस्त्राचा धाक दाखवून खंडणी मागणे, दारू पिऊन धिंगाणा करणे, दुचाकींचे आवाज काढण्याचा प्रकार घडला होता गावगुंडावर कारवाई आवश्यक या घटनांमुळे गुंड प्रवृत्तीच्या लोकांना नेमकं कोण मदत करते? कोणाच्या जीवावर ते दादागिरी करतात? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित राहत आहे.

# सोलापुरात बारबालांवर पैशांची उधळण, ऑर्केस्ट्रा बारमधील 49 जणांवर कारवाई, 60 लाखांचा मुद्देमाल जप्त

सोलापूर : जिल्ह्यातील गुलमोहर ऑर्केस्ट्रा बारमध्ये (B a r ) चित्रपटांच्या गाण्यांवर नृत्य करणाऱ्या बारबालांवर पैशांचा पाऊस पाडला जात होता. याची माहिती मिळताच पोलिसांनी (Police) गुलमोहर ऑर्केस्ट्रा बारमध्ये छापा (police raid) टाकला. पहाटे साडेतीन वाजता टाकलेल्या या छाप्यामध्ये 49 जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलंय. यामध्ये 2 लाख 71 हजार 380 रुपयांच्या रोख रकमेसह 59 लाख 78 हजार 880 रुपये किमतीचा मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला आहे. पोलीस आयुक्तांच्या विशेष पोलीस पथकाने (special police squads) हा छापा टाकला असून विजापूर नाका पोलीस ठाण्यात याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. दरम्यान, गुलमोहर ऑर्केस्ट्रा बार हा माजी पोलीस कर्मचाऱ्यांचा मुलगा चालवत असल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. यापूर्वी देखील या बारवर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली होती. या ऑर्केस्ट्रा बारमध्ये सोलापूर शहर, जिल्ह्यासह कर्नाटकातील ग्राहक मोठ्या प्रमाणात येत असतात, अशी माहिती आहे.



49 जणांवर कारवाई

सोलापूर जिल्ह्यातील गुलमोह ऑर्केस्ट्रा बारमध्ये पोलिसांना पैशांची उधळण सुरु असल्याची माहिती मिळाली. यानंतर पोलिसांनी सापळा रचून या बारव छापा टाकला. यावेळी बारबालांवर पैशांची उधळण होत असल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं. बारमध्ये पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात 2 लाख 71 हजार 380 रुपयांच्या रोख रकमेसह 59 लाख 78 हजार 880 रुपये किमतीचा मुद्देमाल देखील जप्त करण्यात आलाय. तर 49 जण यावेळी पोलिसांनी जेरबंद केले आहेत.

बारचं पोलीस कनेक्शन?

गुलमोहर ऑर्केस्ट्रा बार हा माजी पोलीस कर्मचाऱ्यांचा मुलगा चालवत असल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. त्यामुळे संशयाची सुई आणखी खोल जातेय. यापूर्वी देखील या बारवर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली होती. त्यानंतर घडलेला हा दुसरा प्रकार आहे. या ऑर्केस्ट्रा बारमध्ये सोलापूर शहर, जिल्ह्यासह कर्नाटकातील ग्राहक मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यामुळे या बारला अभय तर दिला जात नाही ना, अशीही चर्चा आहे. आता पोलीस या बारवर काय कारवाई करतात, या बारसंबंधित मोठ्या हातांवर पोलीस कारवाई करणार, की त्यांना अभय देणार, ये येत्या काळातच कळेल.

बारचे परराज्यातही ग्राहक

सोलापुरातील या गुलमोह ऑर्केस्ट्रा बारमध्ये परराज्यातून ग्राहक येत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळतेय. त्यामुळे या बारमधील कनेक्शनकडे पुन्हा एकदा संशयाच्या दृष्टीनं पाहिलंय जातंय. माजी पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलाचा बार असल्याने तर या बारकडे दुर्लक्ष केलं जातं नाहीये ना, असाही प्रश्न सध्या चर्चेत आहे. आता सोलापूर पोलीस काय कारवाई करतात,

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार १५ ते २१ मार्च - २०२२

# मिरची पावडर डोळ्यात फेकून व्यावसायिकाला 5 लाखांना लुटलं



अमरावती : भाईपुर परिसरात चोरट्यांचा सिनेस्टाईल थरार पाहायला मिळाला. कारमधून आलेल्या चौघांनी मालाचे पैसे घेऊन जाणाऱ्या कर्मचाऱ्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकून जवळपास ५ लाख लांबवले. जिल्ह्यातील मोर्शी तालुका अंतर्गत येणाऱ्या भाईपुर परिसरातील ही घटना आहे.

सविस्तर माहिती अशी की, मोर्शी तालुक्यातील भाईपुर परिसरात कारमधून आलेल्या चौघांनी मालाचे पैसे घेऊन जाणाऱ्या कर्मचाऱ्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकून ४ लाख ८१ हजार रुपये लुटून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी प्रशांत अर्जुन राव वैद्य (४६, कृष्णनगर, वर्धा) यांनी मोर्शी पोलिसांत तक्रार दाखल केली.

फिर्यादी हे एका विडी कंपनीत कार्यरत असून घटनेच्या वेळी ते चालकासह कंपनीच्या बोलेरो पिकअप वाहनाने (एमएच ३२/ क्यू ४८३७) मालाचे पैसे घेऊन मोर्शीवरून वरुडकडे जात होते. दरम्यान, त्याच वेळी भाईपूर बसस्टॉप परिसरात पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या चौघांनी उतरुन चालकासह त्यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून त्यांच्याजवळील रक्कम पळवून नेली.

# रशिया-युक्रेन युद्धामुळे महागाई वाढायची काळजी नको; केंद्र-राज्य सरकार योग्य ती काळजी घेईल: एकनाथ शिंदे

कल्पेश गोरडे, ठाणे : सध्या रशिया युक्रेन युद्धामुळे देशात आणि राज्यात महागाई होण्याची चिंता भासू लागली आहे. मात्र या युद्धासाठी आपण काही करू शकत नसलो तरी देशात आणि राज्यात महागाईचा लोकांना त्रास होणार नाही. याची काळजी नक्कीच केंद्र सरकार आणि राज्य सरकार घेईल, असा विश्वास एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांनी व्यक्त केला आहे. युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्धामुळे देशात महागाई वाढणार असल्याच्या बातम्या पसरू लागल्या आहेत. शेवटी रशिया-युक्रेनचं युद्ध आहे त्यात आपण काही करू शकत नाही. मात्र, अद्याप तरी महागाई वाढण्याच काही कारण नाही. केंद्र आणि राज्य सरकार ज्या ठिकाणी जनतेला आराम द्यायचा आहे तो देईल. देशात आणि राज्यात महागाईचा लोकांना त्रास होणार नाही, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले. ठाण्यात क्रेडाई आयोजित एमसीएचआय यांच्या मालमत्ता प्रदर्शन निमित्त उपस्थित होते. त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना शिंदे यांनी ठाणे शहराच्या विकासाला अशा प्रकारच्या प्रदर्शनामुळे चालना मिळते. त्याच बरोबर ठाणे शहरामध्ये आपण मोठा इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट सुरु असून याचा फायदा शहराच्या



विकासासाठी होणार असल्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच देशातील आणि राज्यातील इतर घटनांवर आपले मत मांडले.

एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा राज्य सरकारचा प्रकल्प असून राज्य सरकारच्या खर्चातून सुरु असून हा गेम चेंजर प्रकल्प असल्याचे सांगितले. राज्य सरकारकडून तब्बल ५५ हजार कोटी रुपयांचा खर्च केलेला हा प्रकल्प असून राज्यासह देशासाठी हा एक महत्वाचा प्रकल्प असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले. या समृद्धी महामार्गाचा राज्यालाच नव्हे तर देशाला फायदा होणार असल्याची माहिती देखील यावेळी शिंदे यांनी दिली. भविष्यात हा महामार्ग गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली शहरांना जोडणार आहे. तसेच देशातील दोन ते तीन राज्यांना या समृद्धी महामार्ग प्रकल्पाचा फायदा होणार आहे. या महामार्ग प्रकल्पामुळे दोन ते तीन राज्य एकमेकांसोबत जोडले जाणार असल्याची माहिती यावेळी नगरविकास मंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

भाजप नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांना नोटीस देण्यात आली. त्याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात पाहायला मिळाले. राज्यात ठिकठिकाणी त्याचा निषेध नोंदवत महाविकास आघाडीच्या विरोधात नोटीसची होळी करत आंदोलन करण्यात आली. मात्र आता नोटीस बजावली आहे तर फडणवीस यांनी त्यांच्याकडे जी माहिती आहे ती माहिती गृहविभाग खात्याला दिली पाहिजे. नोटीस बजावणे याचा अर्थ आरोप सिद्ध करणे हा नसतो. तसेच राज्य सरकारने सूडबुद्धीने ही नोटीस फडणवीस यांना बजावली असल्याचा आरोप भाजप कडून करण्यात आला आहे.

# 'हिजाब गर्ल' प्रकरण तापलं! पोलिसांनी परवानगी नाकारल्याने 'वंचित'ची न्यायालयात धाव

औरंगाबाद:वंचित बहुजन आघाडी आणि मुस्लिम इत्तेहाद फ्रंट यांची आज ( सोमवारी ) शहरातील आमखास मैदानावर होणाऱ्या सभेला औरंगाबाद शहर पोलिसांनी परवानगी नाकारल्याने आता वंचितने थेट न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे हे प्रकरण आता अधिकच तापण्याची शक्यता आहे. तर पोलिसांनी हिजाब गर्ल मुस्कान खान हिला सुद्धा नोटीस पाठवली असून शहरात येण्यास बंदी घातली आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या सभेला काही तास शिल्लक राहिले असताना औरंगाबाद शहर पोलिसांकडून सभेला परवानगी नाकारण्यात आली आहे. तर याविरोधात वंचीतने न्यायालयात धाव घेतली आहे. यावर बोलताना वंचितचे प्रवक्ते सिद्धार्थ



मोकळे म्हणाले की, आम्ही पोलीस मुख्यालयात आयुक्तांना भेटून परवानगीबाबतचे पत्र त्यांना आणि स्थानिक पोलीस ठाण्यात दिले होते. त्यानंतरही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत आमच्या दोन बैठका झाल्या त्यादरम्यान आम्ही सर्व सहकार्य करू असे पोलिसांकडून सांगण्यात आले होते. मात्र आज कार्यक्रम असताना पोलिसांनी काल रात्री ११ वाजता परवानगी नाकारल्याची माहिती दिली असल्याचं मोकळे म्हणाले.तर, मुस्कान खानला सुद्धा नोटीस बजावणात आली आहे. त्यामुळे या सर्वांच्या विरोधात आम्ही उच्च न्यायालयात याचिका दाखल करत आहोत. आमचे वकील न्यायालयात दाद मागण्यासाठी पोहोचले असल्याची माहिती मोकळे यांनी दिली आहे. तर बेकायदेशीरपणे हे सर्व थांबवले जात आहे. करोना काळात संजय राऊत यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोठा असा मोर्चा निघतो आणि तो प्रसशासनाला चालतो. भाजपसह अनेक पक्ष असे कार्यक्रम घेत असताना त्यावर कोणताही आक्षेप घेतला जात नाही. मात्र वंचित पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या नावाने होणाऱ्या कायद्याच्या प्रबोधनासाठी आम्ही कार्यक्रम घेत असू तर त्याला थांबवण्याच प्रयत्न केला जात आहे.

# सोलापूरमध्ये वारकऱ्यांच्या दिंडीच्या ट्रॅक्टरला भीषण अपघात; 4 जण ठार, 6 गंभीर जखमी

सोलापूर : वारकऱ्यांच्या दिंडीच्या ट्रॅक्टरला मालट्रकने मागून धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघात (Accident) झाल्याची दुर्दैवी घटना सोलापूरमध्ये घडली आहे. या अपघातात 4 जणांचा मृत्यू (Death) झाला असून जवळपास 6 जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. मृतांमध्ये 2 पुरुष, एक महिला आणि एका लहान मुलाचा समावेश आहे. अपघातातील सर्व वारकरी तुळजापूर तालुक्यातील कदमवाडी गावचे रहिवासी आहेत. सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील कोंडीजवळ भरधाव वेगात येणाऱ्या मालवाहू ट्रकने ट्रॅक्टर ट्रॉलीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला आहे. घटनास्थळी स्थानिक पोलिस दाखल झाले असून बचाव कार्य सुरु आहे.

एकादशीनिमित्त पंढरपूरला दर्शनासाठी चालले होते वारकरी तुळजापूर तालुक्यातील कदमवाडी गावातील 22 वारकरी ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये बसून पंढरपूरला चालले होते. सोमवारी एकादशी असल्याने हे वारकरी पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी चालले होते. सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर कोंडीजवळ ट्रॅक्टर येताच मागून भरधाव वेगात येणाऱ्या मालवाहू ट्रकने या ट्रॅक्टर ट्रॉलीला जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की ट्रॅक्टर ट्रॉली 500 ते 600 फूट अंतरापर्यंत फरपटत गेली. यामध्ये 4 वारकऱ्यांचा मृत्यू झाला असून 6 जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत



बचावकार्य सुरु केले. अपघातातील रुग्णांना स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येत आहे.

# गर्लफ्रिण्डच्या नवऱ्याला दारु पाजली, नंतर वर्धा नदीत फेकलं




चंद्रपूर : महिलेने प्रियकराच्या साथीने आपल्या पतीची हत्या (Husband Murder) केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर शहरात हा प्रकार घडल्याची माहिती आहे. अनैतिक संबंधात पतीचा अडथळा ठरत असल्याने महिलेने प्रियकराच्या मदतीने त्याचा काटा काढल्याचा आरोप आहे. तरुणाला नदीत बुडवून दोघांनी त्याचा जीव घेतला, त्यानंतर ही हत्या अपघात असल्याचं भासवण्याचा प्रयत्न केला. एक तरुण दुचाकीसह पुलावरुन वर्धा नदीत कोसळल्याची माहिती गुरुवारी रात्री पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी बचावकार्य करत बाईक नदीतून बाहेर काढली. नदीतील पाण्याला जोरदार प्रवाह असल्यामुळे तरुणाचा मृतदेह दुसऱ्या दिवशी पोलिसांना सापडला. सुरुवातीला हा अपघात असल्याचं पोलिसांनी मानलं होतं, मात्र तपासादरम्यान चकित करणारी माहिती समोर आली.

# औरंगाबादेत लाचखोरीविरोधात आणखी एक कारवाई, सा. बांधकाम विभागाच्या अभियंत्याच्या मुसक्या आवळल्या

औरंगाबादः जिल्हा प्रशासनात भ्रष्टाचार बोकाळला आहे, असा आरोप काही दिवसांपूर्वी खासदार इम्तियाज जलील (MP Imtiaz Jaleel) यांनी केला होता. त्यानंतर आता जिल्हाधिकारी कार्यालयातील सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यानेच लाच घेतल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने (A C B) या अभियंत्याला रंगेहाथ पकडले आहे. औरंगाबाद शहरातील एका समाजिक सभागृहाचे



साडे सहा लाख रुपयांचे बिल मंजूर करण्यासाठी सव्वा लाख रुपयांची लाच अभियंत्याने मागितली होती. ही लाच स्वीकारतानाच सार्वजनिक बांधकाम विभागाचा शाखा अभियंता संजय राजाराम पाटील याला एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले. शहरातील मुकुंदनगर येथील मारुती मंदिराच्या सभागृहाचे आमदार निधीतून बांधकाम करण्याचे टेंडर वाय पी डेव्हलपर्स यांना मिळाले होते. या कंत्राटदाराने दोन वर्षांपूर्वी सभागृहाचे काम पूर्ण केले. परंतु निधी अभावी आणि लॉकडाऊनमुळे बिलाचे काम प्रलंबित राहिले. तीन महिन्यांपूर्वी कंत्राटदाराने पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंता पाटील याची भेट घेऊन निधीची मागणी केली. त्यानंतर पाटील याने सभागृहाची पाहणी केली. काही त्रुटी काढल्या.

# चुना मागितल्याने दोन गटात राडा, हाणामारीत मामाचा मृत्यू



कोल्हापूर : भाच्याचं भांडण सोडवताना झालेल्या हाणामारीत मामाला प्राण गमवावे लागले. कोल्हापूर (Kolhapur) जिल्ह्यात राधानगरी तालुक्यातील धामडमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला. तंबाखूसाठी चुना मागितल्याच्या कारणावरुन दोन गटात राडा (Ruckus) झाला होता. वादाचं रुपांतर हाणामारीत झाल्यानंतर एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. अनिल रामचंद्र बारड (वय 47 वर्ष) असं मयत व्यक्तीचं नाव आहे. कुंभारवाडी भागात मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी राधानगरी पोलिसात गुन्हा (Crime) दाखल करण्यात आला आहे. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून अधिक तपास सुरु आहे.

# चाळीस डिग्री तापमानात पोटाचे व किडनीचे आजार बळावण्याची शक्यता वाढली

आला उन्हाळा -आरोग्य सांभाळानवी

मुंबई/ ठाणे : मार्च महिन्यातच तापमान ४० डिग्रीच्या आसपास पोहचले असून अजून एप्रिल व मे महिना बाकी आहे. तापमान वाढीमुळे शरीरातील पाणी कमी होते व आपणास तहान जास्त लागते, कामावर जाणाऱ्या तसेच ऑफिसच्या बाहेर कामे करणारे अनेक नागरिक , फेरीवाले, टेम्पो, रिक्षा टॅक्सी चालविणारे अनेकजण उन्हाळ्याच्या कालावधीत रस्त्यावर उपलब्ध असलेल्या फेरीवाल्यांकडील लिंबू सरबत, इतर फळांचे ज्यूस व शीतपेये विकत घेतात व पोटाच्या आजाराला निमंत्रण देतात. चाळीस डिग्री तापमानात चाळीसहुन अधिक प्रकारचे आजार बळावण्याची शक्यता वाढण्याची भीती वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे. याविषयी अधिक माहिती देताना नेरुळ येथील शुश्रूषा हार्ट केयर व स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक व हृदय शल्यविशारद डॉ. संजय तारळेकर म्हणाले, , " मार्च ते मे महिन्याच्या कालावधीत नागरिकांच्या पोटांच्या विकारात ३० ते ४० टक्क्यांनी वाढ होते. उष्णता दिवसेंदिवस वाढत असून लोकांना डिहायड्रेशनची समस्या, घसा कोरडा पडणे, मळमळ होणे, डायरिया, अपचन, असे आजार होऊ शकतात. आपल्या शरीरातही विशिष्ट प्रकारचे जंतू असतात. त्यांना संधिसाधू जंतू म्हणता येईल. अनेकदा घशात किंवा पोटामध्ये आतडय़ात हे जंतू असतात. संधी मिळाल्यावर हे जंतू डोके वर काढतात.



अतिश्रम, उन्हात अधिक वेळ फिरणे, अस्वच्छ अन्नपदार्थ खाणे, अशुद्ध पाणी पिणे आदी अनेक कारणांचा हे संधिसाधू जंतू फायदा घेतात आणि जुलाबाला व पोटातील समस्यांना आयतेच निमंत्रण मिळते. सध्या तापमानात झालेल्या वाढीमुळे सतत घाम येतो. त्यातच खाद्यपदार्थ तयार होत असलेल्या भट्टीशेजारी काम करणाऱ्या आचाऱ्यांची स्थिती अधिक वाईट असते त्यांना येणाऱ्या सततच्या घामामुळे जीवाणूंचा संसर्ग वाढण्याचा धोका असतो अन्न शिजवताना, वाढताना हातमोजे (ग्लोव्हज) घालणे फार महत्वाचे आहे. डोसा, पावभाजी, चहा असे पदार्थ गरम असल्याने त्यातून संसर्ग कमी होतो परंतु मात्र सॅण्डविच, भेळपुरी-शेवपुरी- चायनीज , फ्रॅंकी अशा पदार्था साठी कांदे, टोमॅटो कोथींबीर तसेच ज्यूस बनविण्यासाठी लागणारी फळे खूप आधीपासून चिरलेले असण्याची शक्यता असल्याने त्यातून ई-कोलाय, कॉलीफॉर्म, स्टॅफिलोकोकस ऑरिअस अशा हगवण व जुलाबाला कारणीभूत ठरणाऱ्या जीवाणूंचा संसर्ग होत असतो. सहज उपलब्ध होणारी रस्त्यावरील लिंबू पाणी, ताक, फळांचे ज्यूस, आणि इतर ड्रिंक्ससुद्धा पोटांच्या विकाराला कारणीभूत ठरत आहेत." उन्हाळ्यामध्ये हवेतील आर्द्रता कमी होते व कोरडेपणा वाढतो. त्यामुळे आपल्या शरीरातून घाम येण्याचं प्रमाण वाढतं व शरीरातील पाणी पातळी कमी होते. पाण्याचा समतोल ठेवण्याची जबाबदारी किडनीवर असल्याने त्याचा विपरित परिणाम सर्वसाधारण किडनीवर होत असतो. मूत्रपिंड विकाराची कारणे बरीच आहेत परंतु सर्वांत महत्वाचे कारण लघवीचे प्रमाण कमी होते. लघवीचे प्रमाण कमी झाल्यामुळे रक्तदाब वाढतो. शरीरात पाणी व क्षारांचे प्रमाण वाढल्याने सर्वत्र सूज येते. डायबेटीस, उच्चरक्तदाब असलेल्या नागरिकांच्या या काळात मूत्रपिंडांना संसर्ग होण्याचे प्रमाण दुपटीने वाढण्याची शक्यता असते अशी माहिती हृदय शल्यविशारद डॉ. संजय तारळेकर यांनी दिली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898